# ग्रामीण पर्यटन, संधी व आव्हाने

**डॉ. ज्योती ज. व्हटकर** इतिहास विभाग प्रमुख यशवंतराव चव्हाण महा. हलकर्णी

---

**प्रस्तावना** :

भारतीय पर्यटनाचा इतिहास पाहता प्राचीन काळापासून प्रवास हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. प्राचीन काळापासून मानव विविध उद्देशाने प्रवास करत होता. सुरुवातीच्या काळामध्ये पर्यटनाला आजच्या आधुनिक युगातील पर्यटनाचे स्वरूप ही नव्हते मात्र आधुनिक काळात प्रवास हा केवळ कोणते एक उद्दिष्ट समोर ठेवून केला जात नाही तर त्यामधून आनंद, प्राप्ती, विश्रांती, एकटेपणा दूर करणे या सर्व अर्थाने प्रवास केला जात आहे. या सर्व प्रक्रियेलाच पर्यटन असे म्हटले जाते.

पर्यटन ही केवळ एक प्रवासापुरती मर्यादित क्रिया नसून पर्यटन सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय इत्यादी घटकांशी साधर्म्य साधणारी संकल्पना आहे. पर्यटनामुळे राष्ट्रीय एकात्मता आणि जागतिक बंधुभाव या विचारांनाही चालना मिळते. संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटनेने पर्यटनाची व्याख्या देताना म्हटले आहे की-'पर्यटन म्हणजे व्यक्तींनी आपल्या नेहमीच्या वातावरणाबाहेर मनोरंजन, व्यवसाय किंवा इतर कारणांसाठी एका वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी केलेला प्रवास होय'.

पर्यटनाचे विविध पैलू दिसतात प्रस्तुत शोधनिबंधामधून ग्रामीण पर्यटनातून असणाऱ्या संधी, ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व आणि ग्रामीण पर्यटना समोरील असणारी आव्हाने याबाबतीत उहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे :**

1. ग्रामीण पर्यटनामुळे कोणत्या संधी निर्माण होऊ शकतात हे पाहणे.
2. ग्रामीण पर्यटनाच्या विकासामध्ये प्रमुख आव्हाने कोणती असू शकतात हे समजून घेणे.
3. ग्रामीण पर्यटनाच्या विकासासाठी उपाय कोणते असू शकतात याचा विचार करणे.

- **ग्रामीण पर्यटन संकल्पना व व्याख्या** : भारत हा खेड्यांचा देश आहे भारतातील सुमारे 65 ते 70 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात आहे. महात्मा गांधींनी देखील 'खेड्यांकडे चला' असा संदेश दिलेला आहे. गाव, खेडे म्हटले की आपल्यासमोर येतो तो सुंदर निसर्ग तेथील साधी जीवन शैली तेथील संस्कृती. आज शहरी भागातील बरीच कुटुंब याकडे आकृष्ट होताना दिसत आहेत. पूर्वीच्या काळी पर्यटन म्हटले की मोठी शहरे, प्रसिद्ध पर्यटन स्थळे यांचा प्रामुख्याने विचार केला जात होता. परंतु आता विचार बदलताना दिसत आहेत.

ग्रामीण पर्यटन हा पर्यटन क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण आणि झपाट्याने विकसित होणारा पर्यटनाचा प्रकार आहे. शहरातील गजबज, ताणतणाव, प्रदूषण यामुळे काही काळ निवांत, शांत आणि नैसर्गिक वातावरणामध्ये वेळ घालविण्याची सर्वांनाच इच्छा होत असते. अशावेळी एक उत्तम पर्याय म्हणून ग्रामीण पर्यटनाकडे पाहिले जाते. ग्रामीण भागातील साधी राहणी, शेतीपद्धती, पारंपारिकता, जीवनशैली हे सर्व घटक पर्यटकांना आकर्षित करतात. त्यामुळे ग्रामीण पर्यटन हे केवळ मनोरंजनाची साधन नसून ते सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध जपणारे प्रभावी माध्यम सुद्धा आहे.

ग्रामीण पर्यटनामुळे गावांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. ग्रामीण पर्यटनाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सांस्कृतिक जतन. प्रत्येक गावाची स्वतःची एक वेगळी ओळख असते. त्यांची भाषा, सण-उत्सव, लोककला इ. टिकवून ठेवण्यासाठी ग्रामीण पर्यटनाचा खूप उपयोग होतो.

जागतिक पर्यटन संघटना (UNWTO) यांच्या मते,-'ग्रामीण पर्यटन म्हणजे ग्रामीण भागातील पर्यावरण, संस्कृती आणि जीवनशैली यांचा अनुभव देणारे पर्यटन होय.' थोडक्यात आपण असेही म्हणू शकतो की ग्रामीण पर्यटन म्हणजे ग्रामीण भागातील वैशिष्ट्यांचा अनुभव होय.

- **ग्रामीण पर्यटनामध्ये अनेक घटक आहेत, त्यातील काही घटक:**

1. **कृषी पर्यटन** : ग्रामीण भागातील शेतकरी, पशुपालन, ग्रामीण संस्कृती, निसर्ग यांचा प्रत्यक्ष अनुभव यातून पर्यटकांना घेता येतो.
2. **सांस्कृतिक पर्यटन** : या घटकांमधून पर्यटक एखाद्या ठिकाणची संस्कृती, प्रथा परंपरा, लोककला यांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकतो.
3. **नैसर्गिक पर्यटन** : निसर्गाच्या विविध घटकांचा म्हणजे डोंगर, जंगल, नद्या, धबधबे, वन्यजीव, इ. सारख्या नैसर्गिक स्थळांचा अनुभव या घटकातून मिळतो.
4. **धार्मिक पर्यटन** : मन:शांती, अध्यात्मिक समाधान मिळवण्यासाठी धार्मिक स्थळांना म्हणजेच मंदिरे, मशिद, चर्च, इत्यादी पवित्र स्थळांना भेट देऊन केलेल्या पर्यटनाला धार्मिक पर्यटन म्हणतात.

- **ग्रामीण पर्यटनाकडे पर्यटक आकर्षित का होतात?**

ग्रामीण पर्यटनाच्या वाढीसाठी अनेक कारणे दिसतात.

1. घड्याळाच्या काट्यावर चालणारे शहरी भागातील धकाधकीचे जीवन.
2. वाढता ताण तणाव, मानसिक, शारीरिक आरोग्य तक्रारी.
3. ग्रामीण निसर्ग सौंदर्याची ओढ.
4. प्रसन्न व शांत वातावरण.
5. पारंपारिक संस्कृती व परंपरा.
6. स्थानिक रोजगाराच्या संधी.
7. आर्थिक बचत.
8. कौटुंबिक बांधिलकी.

पर्यटक ग्रामीण पर्यटनासाठी आकृष्ट होण्यासाठी यासारखी कित्येक कारणे आहेत.

- **ग्रामीण पर्यटनामधील रोजगाराच्या संधी** : ग्रामीण पर्यटन हे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. ग्रामीण पर्यटनामुळे अनेक आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक संधी उपलब्ध होतात ग्रामीण पर्यटनाच्या अनुषंगाने आज अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होताना दिसत आहेत. त्यातील काही ढोबळ संधींचा उल्लेख याठिकाणी केलेला आहे.

**उदा**.

1. **होमस्टे व्यवसाय** : ग्रामीण पर्यटन विकासामध्ये होम स्टे व्यवसायाची भूमिका खूप मोठी दिसते. होमस्टे म्हणजे पर्यटकांनी कोणत्याही हॉटेलमध्ये न राहता गावातील स्थानिक कुटुंबाच्या घरी राहणे यामुळे पर्यटकांना ग्रामीण जीवनशैली, ग्रामीण अन्नपदार्थ परंपरा जवळून अनुभवायला मिळतात. यामुळे पर्यटकांना शहरी धकाधकीच्या वातावरणातून दूर, शांत आणि नैसर्गिक वातावरणात राहण्याचा अनुभव मिळतो.

या व्यवसायाच्या अनुषंगाने व्यावसायिक खूपदा आपल्या घरामधीलच एक-दोन खोल्या पर्यटकांना राहण्यासाठी उपलब्ध करून देतात. काही वेळा स्वतःच्या शेतामध्ये दोन-तीन खोल्यांच्या घरांची किंवा काही वेळा तंबूंची व्यवस्था ही केलेली दिसते. यामध्ये ते केवळ राहण्याची सोय उपलब्ध करतात असे नाही तर काही मनोरंजनाची साधने, बैठे खेळ, शेततळयामध्ये पोहणे, बैलगाडी सफर इ. अनेक साधनेही पुरवतात. उदा. आजरा चित्री प्रकल्प व ॲग्रो टुरिझम, पन्हाळा ॲग्रो टुरिझम, आंबा घाट परिसर, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवबाग, कास पठार यांसारखी खूप उदाहरण देता येतात.

2. **हस्तकला विक्री** : ग्रामीण पर्यटनांमध्ये हस्तकला विक्री ही स्थानिक लोकांसाठी अत्यंत महत्त्वाचे रोजगाराची संधी आहे. ग्रामीण भागात पारंपरिक कौशल्ये, कलात्मकता आणि स्थानिक संस्कृती यांचा उत्तम संगम हस्तकलामध्ये दिसून येतो. अगदी सहजपणे पर्यटक याकडे आकर्षित होतात. त्यामुळे हस्तकला विक्री हे केवळ उत्पन्नाचे साधन नसून सांस्कृतिक वारसा जपण्याचे माध्यम ही ठरते. ग्रामीण भागातील मातीची भांडी, बांबूच्या वस्तू, लाकडी शिल्पे, गोधडी यासारख्या वस्तूंना मागणी असते. पर्यटक आपल्या गावी जाताना आठवण म्हणून या वस्तू नेत असतात. उदा. चंदगड परिसरात बांबूपासून टोपल्या, खुर्च्या, सजावटीच्या वस्तू पर्यटकांना आकर्षित करतात. तसेच पर्यटकांना भुरळ घालणारी कोल्हापुरी चप्पल. आज ती साता समुद्रा पार पोहोचली आहे. कोकण भागातील फळ, फळावली, लाकडी वस्तू इ.

काही ठिकाणी 'हस्तकला हाट' किंवा 'ग्रामीण बाजार' भरविला जातो. याठिकाणी पर्यटकांना विविध वस्तू एकाच ठिकाणी पाहायला आणि खरेदी करायला मिळतात. ग्रामीण पर्यटनातील हस्तकला विक्री ही ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारी, रोजगार निर्मिती वाढवणारी आणि पारंपरिक कलेचे जतन करणारी महत्त्वाची संधी आहे.

3. **पारंपरिक अन्नपदार्थ विक्री** : पारंपरिक अन्नपदार्थ हे त्या भागाच्या संस्कृतीचे प्रतीक असते. पर्यटकांना स्थानिक जेवणाचा आस्वाद दिल्यास त्या प्रदेशातील सर्व परंपरा आणि जीवन पद्धतीचा अनुभव मिळतो. आजकाल शहरातील लोकांना घरगुती, नैसर्गिक आणि पारंपारिक चव असलेले पदार्थ आकृष्ट करतात.

**उदा.** सोलापूरची कडक भाकरी, शेंगा चटणी, कोल्हापूरचा तांबडा पांढरा रस्सा, चंदगडची तांदळाची भाकरी, नाचणीचे पदार्थ, गावराण जेवण, इ. पारंपारिक अन्नपदार्थ विक्री ही ग्रामीण भागातील कमी गुंतवणुकीत जास्त नफा देणारी आणि सतत टिकणारी संधी आहे. पारंपारिक पदार्थ विक्रीमुळे गावातील महिलांना आणि युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

4. **पर्यटक वाहतूक सेवा** : पर्यटकांना गावातील पर्यटन स्थळे, ऐतिहासिक स्थळे पाहण्यासाठी वाहतुकीच्या साधनांची आवश्यकता असते. त्यामुळे यातून स्थानिक लोकांना रोजगार मिळू शकतो. यामध्ये स्थानिक वाहन सेवा, सायकल किंवा बाईक भाड्याने देणे, बैलगाडी सफर, ट्रॅक्टर व्यवस्था, इत्यादी चा समावेश होऊ शकतो.

5. **पर्यटन मार्गदर्शक** : गावातील सुशिक्षित युवक युवतींसाठी मार्गदर्शक म्हणून संधी उपलब्ध होऊ शकते. यामध्ये स्थानिक इतिहास, संस्कृती, निसर्ग, पर्यटन, कृषी पर्यटन, भाषांतर सेवा यासारख्या अनेक गोष्टींचा समावेश होतो.

- **ग्रामीण पर्यटनातील आव्हाने**

1. **पायाभूत सुविधांची कमतरता** : ग्रामीण भागात अनेक ठिकाणी रस्ते, निवासव्यवस्था स्वच्छता, पाणी आणि वाहतूक व्यवस्था इत्यादी सुविधांची कमतरता दिसते.
2. **विपणनाची कमतरता** : ग्रामीण पर्यटन स्थळांची योग्य पद्धतीने जाहिरात, पर्यटकांच्या गरजा लक्षात घेणे म्हणजेच विपणनाची कमतरता दिसते.
3. **पर्यटनाबद्दल जागरुकतेचा अभाव** : अजून ग्रामीण भागामधील लोकांना पर्यटना बद्दल किंवा एकंदरीतच या व्यवसायाबद्दल पुरेशी माहिती नाही. त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.
4. **पर्यावरणीय समस्या** : पर्यटनाचे नियोजन योग्य पद्धतीने झाले नाही तर पर्यावरणावर त्याचा परिणाम होतो. उदा. कचरा व्यवस्थापन, पाण्याचा गैरवापर, जंगलतोड, ध्वनी व वायुप्रदूषण इत्यादी.

ग्रामीण पर्यटनांमध्ये यापेक्षाही कितीतरी आव्हाने असू शकतात या ठिकाणी काही मोजक्याच आव्हानांचा उल्लेख केला आहे

- **ग्रामीण पर्यटन समस्यांवर उपाय :**

ग्रामीण पर्यटनासमोरील आव्हाने पहाता त्यावर उपाय काय असावेत याचा विचार करता काही गोष्टी समोर येतात.

१. शासन, ग्रामस्थ, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे संयुक्तिक प्रयत्न खूप आवश्यक वाटतात.

२. शासनाने ग्रामीण पर्यटनासाठी विशेष योजना राबवुन आर्थिक मदत, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन उपलब्ध करून दिले पाहिजे.

३. स्थानिक लोकांनीही पर्यटनाच्या संधी ओळखून त्याचा सकारात्मक उपयोग केला पाहिजे.

४. पर्यटनाचा विकास साधताना पर्यावरण आणि संस्कृती यांचा समतोल ही महत्त्वाचा आहे.

- **एकूणच :** ग्रामीण पर्यटनामुळे शहर आणि गाव यातील दरी कमी होण्यास मदत होते. शहरातील लोकांना ग्रामीण जीवनाचा आनंद मिळतो, तर ग्रामीण लोकांना आधुनिक जगाशी संपर्क साधता येतो. या परस्पर संवादामुळे समाजात समजूतदारपणा आणि सहकार्याची भावना वाढण्यास मदत होते. ग्रामीण पर्यटन हे सामाजिक एकात्मता वाढवणारे ही माध्यम आहे.

आजच्या काळात पर्यटन क्षेत्रात विविधता येत असतानाही ग्रामीण पर्यटनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. लोकांना प्रत्यक्ष अनुभव घ्यावयाचा असतो. हा अनुभव अगदी सहज ग्रामीण भागातच मिळतो. त्यामुळे ग्रामीण पर्यटनाचा विकास हा देशाच्या एकूण विकासासाठी महत्त्वाचा ठरतो. योग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि लोकांचा सहभाग यामुळे ग्रामीण पर्यटन एक यशस्वी आणि शाश्वत विकासाचा मार्ग ठरू शकतो.

**निष्कर्ष :**

1. ग्रामीण पर्यटनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते.
2. ग्रामीण पर्यटनामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतात.
3. स्थानिक संस्कृती व परंपरांचे जतन होते.
4. कृषी पर्यटनाला चालना मिळते.
5. मूलभूत सुविधा विकासाला गती मिळते.
6. ग्रामीण भागाचे शहरी भागाशी आर्थिक व सामाजिक संबंध वाढतात.
7. ग्रामीण पर्यटन सामाजिक एकात्मता वाढवणारे माध्यम आहे.

**संदर्भ :**

1. डॉ. घारपुरे विठ्ठल - पर्यटन भूगोल, पिंपळापुरे पब्लिश नागपूर.
2. पाटील एस. जी. - ग्रामीण विकास, फडके प्रकाशन कोल्हापूर.
3. जाधव ए.डी. - पर्यटन आणि ग्रामीण अर्थव्यवस्था, डायमंड प्रकाशन पुणे.
4. डॉ. गायकवाड संजय - ग्रामीण पर्यटन, युनिक अकॅडमी पुणे.
5. डॉ. पाटील दत्तात्रय - ग्रामीण विकास आणि पर्यटन, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे.
6. www.agritourism.in.